ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

Indian Streams Research Journal

# साहित्यः संस्कृती आणि धर्म

प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

## प्रास्ताविक :-

साहित्य आणि संस्कृतीबरोबरच धर्म ही मूल्ये परस्परावलंबी आहेत. कारण संपूर्ण मानवी जीवनाला आकार देण्याचे कार्य उपरोक्त मूल्ये करतात. म्हणूनच साहित्यविश्वाला व्यापकता प्राप्त करुन देण्याबरोबरच त्यास विश्वात्मकतेचे लेणंही प्राप्त करुन देतात. भारतीय साहित्याला लोककथेचे, लोककलेचे लेणं लाभलेलचं आहे. हे आपण नाकारु शकत नाही. पण 'धर्म' ही मूल्ये अधिकच प्रभावशील राहिलेले आहे. अत्यंत समावेशक आणि व्यापक अर्थाने 'भारतीय साहित्यात याचा वावर आहे.'

भारतीय साहित्यात 'धर्म' हा शब्द रुढी, परंपरा, चालीरीती, नियम, कुळाचार, श्रद्धा, अंधश्रद्धा, संस्कृती या अर्थाने वापरला जातो. देशातील सर्वच म्हणजे कथा, कादंबरी, नाटक, कविता, ललित आणि ललितेत्तर वाङ्मयात 'धर्म' या संकल्पनेचा वापर मोठया प्रमाणत असल्याचे दिसून येते.

धर्म या संकल्पनेचा प्रथम विचार करणे आवश्यक आहे. तद्नंतरच धर्माचा साहित्यावर कसा प्रभाव आहे. साहित्यामध्ये धर्माचा कसा शिरकाव होत गेला याचा शोध घेणे मला क्रमप्राप्त वाटते. धर्माची व्याख्या सांगताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी




म्हणतात, "इष्टप्राप्त्यर्थ व अनिष्ट निवारणार्थ अलौकिक शक्तीची साधना किंवा आराधना म्हणजे धर्म" तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्माची संकल्पना अतिशय मार्मिकपणे मांडलेली आहे. "व्यक्तीला एखादी चांगली किंवा वाईट गोष्ट साध्य करण्यासाठीची देवाला करावी लागणारी अर्चना म्हणजे धर्म." अशी साधी-सोपी एखाद्या सामान्य माणसाला समजेल अशा शब्दांत धर्माची संकल्पना जोशी यांनी मांडली आहे.
कोणतीही गोष्ट प्राप्त करण्यासाठी व्यक्तीकडे प्रथमत: जी गोष्ट प्राप्त करावयाची आहे, त्याविषयीची श्रद्धा असणे महत्वाचे आहे. श्रद्धा नसेल तर इष्ट कार्यात सफल होता येत नाही. धर्मात श्रद्धेला अनन्यसाधारण महत्व आहे. धर्मात ईश्वरी शक्तीचा अंश असतो असा भारतीय लोकांचा समज आहे. तो प्रत्येक धर्मात असतोच.

भारतीय कथात्मक साहित्यात रामायण, महाभारत या महान धर्मग्रंथाने संस्कारधर्म, आचार-विचार, विवेक, अविचार इत्यादी गोष्टींवर प्रकाश टाकला. त्यामध्ये जीवनदर्शनाचे यथार्थ वर्णन करण्यात आले आहे. धर्म, वाङ्मय या रुढ अर्थाने आपण याकडे पाहणे गरजेचे आहे. धर्मचिंतनातून वारकरी महानुभाव, दत्त, सुफी, संप्रदायांनी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केलेली आहे. तुकोबाची अभंगगाथा, ज्ञानोबाची 'ज्ञानेश्वरी गाथा' एकनाथाचे भारुड, रामदासांचे 'मनाचे श्लोक' हे आजही मराठी मनावर धर्म वाङ्मयातून प्रेरित झालेले साहित्याचे मौलिक रत्न आहे. हे रत्न प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक मराठी वाङ्मयाला उभारी देतात, पेलवितात, त्यांना वाङ्मयाची गुणात्मकता प्राप्त करुन देतात.

## समाज आणि संस्कृती

लेखक हा समाजजीवनाचा घटक असतो. त्यामुळे लेखकाला त्यांच्या कालचित्रात आलेले अनुभव शब्दरुपाने त्यास रोपन करुन त्यास वाङ्मयीन अंगाने एकत्रित करुन साहित्यकृतीद्वारे ते अनुभव वाचकांसमोर मांडत असतो. रुढ अर्थाने समाज म्हटला की, सांस्कृतिक पर्यावरण येणे क्रमप्राप्त असते. संस्कृती म्हटली की, धर्माचा भाग येणे साहजिकच आहे. रामायणातील दशरथाच्या दु:खाची तीव्रता महर्षी वाल्मिकींनी सत्ययुगात शब्दरुपांनी भातीय समाजासमोर अविष्कृत केली तर आधुनिक काळात कर्नल शिवाजी सावंत यांनी महाभारतातील कर्णाच्या दु:खाची गाथा 'मृत्यूंजय' या अभिजात कलाकृतीमधून प्राचीन काळातील धर्मस्थितीचा लेखाजोखा प्रकाशित केला. यावरुन आपणास धर्माचा साहित्यात कसा शिरकाव होत गेला याची जाणीव प्राप्त होते. धर्म, संस्कृती आणि समाज हे एकमेकांवर कसे परिणाम करतात हे सांगताना डॉ.सुमन बेहरे म्हणतात, "मनुष्य पुन्हा जीवनाला सामोरा जातो. हे धर्माचे सुप्त कार्य आहे.

त्यामुळे सामाजिक जीवन सुरळीत चालू रहाते व माणसाच्या हातून असामाजिक वर्तन नाही, हा देखील सामाजिक नियंत्रणाचाच भाग आहे. समाज, धर्म आणि संस्कृती हे एका व्यवस्थेचे घटक असल्याने, एकमेकांवर परिणाम करतात, पण समाज आणि संस्कृती यांना आकार देण्याचे सुरुवातीचे कार्य धर्म करतो." डॉ.सुमन बेहरे यांनी मांडलेले विचार धर्म आणि संस्कृतीबरोबरच समाजजीवनाला कसे पुरक आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न डॉ.बेहरे यांनी केला आहे. मनुष्यावर धर्माचा पगडा जबरदस्त असतो. श्रद्धा आणि रितीरिवाज यांना तो खतपाणी घालत असताना मनुष्याला वेगवेगळया जीवनानुभवाला सामोरे जावे लागते. त्यावेळेस मनुष्याच्या हातून जे इष्ट किंवा अनिष्ट वर्तन घडेल ते असामाजिक स्वरुपाचे असते तर नकळतपणे ते समाज, धर्म आणि संस्कृती या घटकांवरच अवलंबून असते. पण धर्माला आकार देण्याचे कार्य समाज व संस्कृतीच करीत असतात. समाजाला आकार देण्याचे कार्य संस्कृती करते तर संस्कृती समाजाचे प्रतिबिंब साहित्यातून होत असते. आजच्या काळात आपण ज्या स्थळी आहोत तेथे साहित्यातील धर्मविषयक भूमिका विशद करणे हे प्रस्तुत संशोधनात महत्वाचे वाटते. त्यासाठी गोविंद पानसरे यांनी भारतीय समाजातील बहुजनांवर धर्माने लादलेल्या गुलामगिरीमुळे धर्म हे साहित्याचे प्रयोजन कसे होत गेले याचा विचार प्रकट करताना गोविंद पानसरे म्हणतात, "गुलामी लादणाऱ्या टाकाऊ परंपरा उद्ध्वस्त करणे ही सत्यसंशोधकांची गरज होती. मूर्तिभंजकाची भूमिका वठवणे त्यांना आवश्यकच होते. गुळगुळीत आणि मिळमिळीत भूमिका बहुजनांच्या हितसंबंधांचे रक्षण करु शकत नव्हती. बारीक-सारीक दुबळया हत्यारांनी त्यांचे भागत नव्हते. त्यांना दगड फोडणाऱ्या हातोडयांची आणि वडाराच्या सुतकीचीच गरज होती. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीच्या सत्यशोधक साहित्यिकांनी त्यांची लेखणी आणि वाणी दगडफोडयाच्या सुतकीसारखी वापरली. प्रस्थापितांनी या साहित्यासंबंधी बोंबाबोंब केली ती त्यामुळेच. त्यांनी लादलेल्या मूर्तीचे भंजन करणाऱ्या हातोड्यासंबंधीने बोंबलतील नाही तर काय करतील?"

गोविंद पानसरे यांनी बदलत्या प्रवाहात होणाऱ्या धर्मविषयी तत्संबंधीत घडामोडीचे अनास्थेपणाच्या भूमिकेतून आपले विचार व्यक्त केले आहे. जे लोक सामान्य जनतेच्या हिताचे धर्मविषयक भावनांचा गैरवापर करुन त्यांना गुलामगिरीसारख्या अमानवी तुरुंगात टाकतात. धर्माची स्थलकालसापेक्षताही बदलत जाऊन बहुजनांना पूर्णपणे पारतंत्र्यात रहावे लागते. त्यातून मुक्त होण्यासाठी दगड-धोडयांची आवश्यकता लागत नाही. त्यासाठी साहित्यासारखे लेखन-वाणी हेच मुख्य हत्यार आवश्यकत असते. म्हणून 'धर्म' हे साहित्याचे प्रयोजन ठरते हे धर्मविषयक भूमिकेचे संक्षिप्त पण मार्मिक विवरण गोविंद पानसरे यांनी विशद केले आहे.

**संस्कृती आणि धार्मिक जीवन**

मराठी साहित्याच्या दालनात वि.स.खांडेकर लिखित 'ययाति' या पौराणिक कादंबरीने मराठी वैभवाला गतिमानता प्राप्त करुन दिले आहे. १९६० ला या कादंबरीस 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार मिळाला व पुढे ज्ञानपीठ हा साहित्यातील सर्वोच्च किताब 'ययाति' स मिळाला. पौराणिक अंगाने समोर आलेली ही कादंबरी मानवी जीवनातील संवेदनात्मक जाणीवेतील गुढकात्मकता व 'ययाति' राजाच्या वासनात्मकतेचे रहस्य उलगडते. त्याचबरोबर कच आणि शुक्राचार्यांमधील धार्मिक घटनांचा अर्थ नव्याबाजूने घेता येतो. एकूणच 'ययाति' ही कादंबरी 'धार्मिक' अंगाने विचार केल्यास खूप काही हाती सापडते. लेखक वि.स.खांडेकरांनी आपल्या प्रतिभेद्वारे 'ययाति' या महान कादंबरीतून धार्मिक जीवनाचा चमत्कार घडविला आहे. 'ययाति' चे समीक्षात्मक दृष्टीने अभ्यास करताना अभ्यासक, समीक्षक या कादंबरीस पौराणिक अर्थाने विशेषणे लावीत आले आहेत. पौराणिक कथानक असलेल्या या कादंबरीत धार्मिक जीवनाचे ही प्रतिबिंब उमटले आहे. कारण पौराणिक असलेल्या कथानकात त्यातील माणसे, व्यक्ती, नायक, नायिका ह्या धार्मिक बार्बीशी निगडीत आहेत. 'ययाति' या शीर्षकापासूनच आपणास महाभारतातील पात्राचा व वंशावळीचा शोध लावू पाहतो. 'ययाति' हे पात्राच धर्मनिष्ठेशी संबंधीत आहे. हे कादंबरी वाचन पूर्ण झाल्यावर आपल्या लक्षात येते. याविषयी जेष्ठ विचारवंत चंद्रकांत बांदिवडेकर यांनी 'ययाति' ही कादंबरी धार्मिक जीवन दर्शनांनी किती व्यापक अर्थानी खांडेकरांनी प्रकट केली आहे. हे सांगताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, "खांडेकरांचा जीवनविषयक दृष्टीकोन भोग आणि त्याग, काम आणि धर्म, शक्तीची उपासना आणि मंगल, उपासना आणि मंगल कामना, गृहस्थ धर्म आणि संन्यासधर्म यात समन्वय त्यांना हवा आहे. कामवासना, प्रेमभावना आणि भक्तीभावना ही एकाच वासनेची क्रमाक्रमानं अधिक सूक्ष्म, सुंदर, उन्नत आणि उदात्त होत जाणारी चार रुपं आहेत, असं ही खांडेकरांना दाखवावयाचं आहे. यासाठी त्यांनी कच-देवयानीचं प्रेम कल्पून पुढे कच या सर्व भूमिकेतून उन्नत होत जातो हे दाखवलं आहे."

मराठी कादंबरीविश्वात श्री.ना.पेंडसे यांचे नाव अवर्जून घेतले जाते. त्याचे कारण म्हणजे ज्वलंत प्रसंगचित्रण, बोलकी व्यक्तिचित्रणे, वातावरण निर्मिती, सहज सोपी शब्दशैली यामुळे पेंडसे यांचे लेखन मराठी वाचकाला सहज पचनी पडले आहे. या कारणानीच 'रथचक्र' ही कादंबरी साहित्य अकादमीपर्यंत मजल मारु शकली. वाङ्मयीनदृष्टया ही कादंबरी पेंडसेच्या इतर कादंबऱ्यांपेक्षा या कादंबरीतील भावजीवन एका अभागी स्त्री-नायिकेच्या भोवती फिरते. तिला मिळणारी वागणूक, हवेलना जगण्यातील नैराश्यपणा, एकाकी जीवन, कौटुंबिक दुरावलेपणा यांसारख्या असंख्य प्रश्नाभोवती श्री.ना.पेंडसे यांनी 'रथचक्र' ही कादंबरी उभी केली आहे. वास्तविक ही कादंबरी धार्मिक अंगाने स्पर्श करुन जाते. कारण भारतीय समाज व्यवस्थेमध्ये 'कुटुंब' या घटकास अनन्यसाधारण महत्व आहे. धार्मिक अन्वेषातून पाहिल्यास 'कुटुंब' ही संस्था धार्मिक जीवनातून निर्माण झालेली संस्था आहे. या कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र हेच कुटुंबव्यवस्थेतील पडझडीचे चित्रण व्यक्त करते. कुटुंबास सावरण्यासाठी नायिकेचा 'रथ' कमी पडतो. आपल्याच उरातून जन्म घेतलेल्या मुलांकडून तिला 'रथचक्रा' त अडकून बसावे लागले अशी दुर्देवी कहानी या कादंबरीत प्रत्ययास येते.

रणजित देसाई यांची एक यशस्वी लेखक म्हणून मान्यता मिळालेली कादंबरी म्हणजे 'स्वामी' होय. ही रणजीत देसाईची पहिलीच कलाकृती होय. आपल्या प्रतिभासंपन्न वाङ्मय वैभवामुळे १९६४ साली सर्वोकृष्ट साहित्य अकादमीचा पुरस्कार 'स्वामी' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीला मिळाल्यामुळे मराठी साहित्याच्या दरबारास 'एक महत्वाचे माणिक मोती म्हणून देसाई यांच्याकडे पाहिले जाते.'

'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनचरित्रावर आधारलेली ऐतिहासिक झालर लाभलेली सुंदर कलाकृती आहे. माधवराव पेशवा व पुणेकर पेशवे म्हटलं की, तिथे धार्मिक बाबींचा उल्लेख होणे नित्याचे वा सहजपणे आलेले शिरकावपणा म्हणा. या कादंबरीतील मुखपृष्ठचे असंख्य लोकांचे आराध्यदैवत गणेशा (चिंतामणी) वर आधारलेले आहे. यावरुन आपणास धार्मिकतेचे महत्व विशद करते.

मराठी कादंबरीविश्वात पु.ल.देशपांडे यांची 'व्यक्ती आणि वल्ली' कादंबरी महत्वाची आहे. विनोदी ढंगाच्या या कादंबरीने विविध व्यक्तींच्या स्वभाववैशिष्टयांचा अनेक अंगांनी शोध घेण्याचा प्रयत्न पु.लं.नी केला असला तरी प्रत्येक व्यक्तीच्या आत एक 'वल्ली' दडलेली असते हे पु.लं. यांनी या कादंबरीतून स्पष्ट केले आहे.

या कादंबरीत पु.लं.नी निखळ मनोरंजनाचे प्रमेय वापरले असले तरी प्रदेश्, भाषा, संस्कृती, सभ्यता व चिरंतन मुल्यांविषयीची जाणीवा यात व्यक्त होतात. माणसाची स्थूल स्वभाववैशिष्टये 'व्यक्ति आणि वल्ली' मधून दिसतात. 'व्यक्ती आणि वल्ली' या कादंबरीमधून पु.ल.देशपांडे यांनी नारायण, हरितात्या, नामू परीट, सखाराम गटणे, नंदा प्रधान, बोलट, भैय्या नागपूरकर, नाथा कामत, दोन वस्ताद, गजा खोत, अण्णा वडगांवकर, परोपकारी गंपू, चितळे मास्तर, लखू दिसवूड, बापू काणे, ते चौकोनी कुटुंब, तो हंड्रेड पर्सेंट पेस्तनकाका, बबडू, अंतू बर्वा या पात्रांमधून पु.ल.देशपांडे यांनी विनोदाची झालर वापरुन त्या व्यक्तींचा लहरीपणा, अतिशयोक्तीपणा, माणसा-माणसांमधील गुंता-गुंत, कंगोरे, कोपरे, हास्याची तुषारे यातून शहरी जीवन संस्कृतीबरोबरच अंतू बर्व्यांच्या रुपाने कोकणदर्शनही या कादंबरीत मिळते. पु.लं.नी विनोदाला धर्माचे स्वरुप दिले.

याविषयी 'हरितात्या' या 'व्यक्ती आणि वल्ली' मधील पहिल्या कथेत धर्माचा जीवनविषयक संगाचा आजच्या वर्तमानस्थितीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी विनोदी अंगाने मांडलेल्या प्रसंगात पु.ल.सांगतात, "बहुधा हरितात्यांनी उदबत्तीचा एखादा पुडा घेणाऱ्याला मोड देताना पावली घेऊन परत केलेली असायची. संध्याकाळी झोळणा बहुधा सकाळच्याइतकाच भरलेला असायचा आणि आम्ही अंगणात परवाच म्हणताना काटके उघडून हरितात्या ओरडून म्हणायचे,

'जय जय रघुवीर समर्थ !"

दासबोधाची पारायणे करुन इतका अव्यवहारी राहिलेला दुसरा माणूस माझ्या पाहण्यात नाही." पु.लं.नी वरील प्रसंगामधून 'हरितात्या' या पात्रास प्रतिनिधिकत्व देऊन आजच्या काळात धर्माचा सत्वांश शोधत स्वत:च्या स्वार्थासाठी व्यवहार करुन धर्मावर अप्रामाणिकपणाने विश्वास ठेवणारी प्रवृत्ती आजच्या काळात कशा विसंगतीपणाने वागत आहेत. हे वरील प्रसंगामधून स्पष्ट होते'भैय्या नागपूरकर' या कथेत दशरथ ब्रह्माणवाद' सहि मुसलमान, यांविषयीची धर्माची नावे पु.लं.नी 'व्यक्ती आणि वल्ली' मध्ये घेतली आहेत तर 'नाथा कामात' या कथेत अष्टविनायकाचे व्रत, पालीच्या गणपतीचा उल्लेख आला आहे. 'गजा खोत' कथेत 'मुंज' चा नामोल्लेख आहे, तर 'बापूकर्ण' या कथेत 'विवाह सुधारणा' या विषयीचा नामोल्लेख केला गेला आहे.

पु.ल.देशपांडे यांनी आपल्या कादंबरीत व्यक्तीच्या अंर्तमनाचा पट जरी रंगविला असला तरी धार्मिक जीवनाचा अंश प्रत्येक व्यक्तिरेखेवर कळत-नकळतपणे प्रभाव पडलेला दिसून येतो. एकूणच पु.ल.देशपांडे ब्राह्मण वर्गातून पुढे आलेले व्यक्ती असल्याने साहजिकच धर्माचा प्रभाव त्यांच्यावर असणार आहे. त्यामुळेच 'व्यक्ती आणि वल्ली' या कथेत धार्मिक जीवनाचे चित्रण जरी कमी असले तरी नामोल्लेख धार्मिक बाबींच्या मधून बऱ्या-वाईट धर्मक्रियेचा इथे प्रकाश पडलेला दिसतो.

'काजळमाया' या जी.ए.कुलकर्णी यांच्या कथासंग्रहातून बदलत्या मराठी ग्रामीण कथाविश्वाचे यथार्थ दर्शन घडते. सामाजिक जीवनाचा मराठी कथेच्या परिघापलीकडचा आढावा घेताना मानवी जीवनातील धर्मिकतेचा वैचारिक भूमिकेतून आढावा घेतात. मानवी समाजात धार्मिक मुल्यांची जोपासना अगदी प्राचीन काळापासून आजतागायत होत आलेली आहे. समाजजीवनात सर्वच क्षेत्रात रुढी, परंपरा आणि रितीरिवाज मोठया प्रमाणात सांभाळले जातात. यासंदर्भात गं.भा. सरदार लिहितात, "सामाजिक जीवनाच्या सर्वच क्षेत्रांची जडण-घडण काही विशिष्ट प्रथा, उपचार, विधी आणि संकेत यांमधून होत असते. यांच्याद्वारेच परंपरा व संस्कृती यांचे लोण सामान्य जणांपर्यंत जाऊन पोहोचते. धर्मजीवनात तर हे विविध रुप बाह्यांग मोठया प्रमाणात दृष्टोपत्तीस येते." गं.भा. सरदार यांनी मानवी समाजात धर्म संकल्पना जणसामान्यांपर्यंत कशा पद्धतीने रुजूलेली आहे ते अतिशय नेमके पणाने मांडले आहे.

'स्मरणगाथा' या आत्मचरित्रपर कादंबरीत गो.नी.दांडेकरांनी आपल्या जीवनाची यशोगाथा सांगितली आहे. दांडेकरांनी जन्मापासून ते तारुण्यापर्यंतच्या आपल्या भटकंतीचा रेखाटलेला प्रवास अतिशय संयुक्तिक वाटतो. या जीवनप्रवाहात घडलेल्या अनेक घटना प्रसंगांना दांडेकर प्रत्ययकारितेने टिपतात. या घटना प्रसंगाच्या चित्रणावरुन दांडोकरांवर भक्ती आणि धार्मिक जीवनाचा किती मोठा पगडा होता याचा अंदाज घेता येते. देव, धर्म, संत याविषयी त्यांच्या मनात नितांत आदर होता. दांडेकराचे कुटुंबच आध्यात्मिकतेला अनुसरुन असल्यामुळे बालपणापासूनच धार्मिकतेचे संस्कार त्यांच्या बालमनावर घडले होते. दांडेकरांनी आपल्या प्रतिभाशक्तीने अनेकविध ग्रंथनिर्मिती केली आहे. धार्मिक व पौराणिक वाङ्मय लिहिण्यात त्यांचे विशेष प्राविण्य आहे. त्यांच्या या धार्मिक प्रवृत्तीचे यथायोग्य दर्शन दांडेकरांच्या स्मरणगाथेतून प्रभाविपणे घडते. दांडेकरांनी 'श्री संत ज्ञानेश्वर', 'श्री.संत तुकाराम', 'श्री संत नामदेव', 'श्री संत एकनाथ', 'श्री संत तुलसीदास' या संतांच्या जीवनावर केलेले लेखन त्यांच्यावर असणाऱ्या धार्मिकतेचा प्रभाव सिद्ध करणारे आहे. आपल्या बालपणापासूनच्या जीवन-प्रवासाचे

प्रांजळपणाने केलेले शब्दरुप आविष्कार म्हणजे गो.नी.दांडेकरांची 'स्मरणगाथा' होय. बालपणापासून धार्मिकतेचे संस्कार त्यांच्या मनावर कसे उमटत गेले ते त्यांनी केलेल्या वर्णनातून प्रत्ययास येते. दांडेकरांच्या घरात सर्वजण एकत्र येऊन भजन-किर्तन करत असत. लहानपणीच दांडेकरांच्या मनावर हे संस्कार कसे घडत होते, याचे वर्णन दांडेकर प्रत्ययकारीतेने करतात, "धाव पाव सावळे विठाबाई का मनि धरिली अढी' हे भजन सगळीजण आळआळवून गायची मीही त्यांच्या राबेर पण मन मात्र ही अढी घालणाऱ्या विठाबाईविषयी कुतुहलानं दाटून यायचं. याच विठाबाईच्या चरणीच्या गंगा असलेल्या भीमा आणि चंद्रभागा या दोन्ही नद्या एकमेकीशेजारुन दुथडी भरुन वाहत आहेत, असं चित्र मी मनश्चक्षूसमोर रेखाटायचा." दांडेकरांच्या लहानपणापासूनच त्यांच्या घरात कशा पद्धतीचे धार्मिक वातावरण होते, याचा अंदाज घेता येतो.

'सत्तांतर' या व्यंकटेश माडगुळकरांच्या वेगळयाच विषयावर आधारलेल्या आणि मराठी साहित्याच्या वर्तुळात चर्चिल्या गेलेल्या या कादंबरीतून माडगूळकरांनी विदर्भातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण अतिशय नेमकेपणाने घडविले आहे. वन्य प्राण्यांच्या जीवनावर आधारलेल्या प्रस्तुत कादंबरीतून वानरांच्या आत्मिक आणि मूलभूत जीवनाला माडगुळकर अतिशय प्रभावीपणे रेखाटतात. मानव जातीच्या मूळ प्रवृत्तीला साकारणारी प्रस्तुत कादंबरी धार्मिक जीवनचित्रणापासून अलिप्त असल्याचे दिसून येते. सत्तांतराच्या रुपाने माडगुळकर आपणास मानवजातीच्या पुरातन विश्वात घेऊन जातात.

मराठी साहित्याच्या विश्वाला विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' कादंबरीच्या रुपाने एका अनोख्या आणि वास्तव्यपूर्ण जीवनाचे दर्शन घडले आहे. मानवी जीवनाला आणि त्या जीवनातील सामाजिक मूलभूत प्रश्नांना हात घालतानाच ग्रामीण समाज धार्मिक रुढी परंपरांना अंगिकारुन कशा पद्धतीने जीवन जगतो ते प्रत्ययकारीतेने मांडले आहे. 'झाडाझडती' ही सात गावातील विस्थापितांची करुण व भीषण कहाणी आहे. प्रस्तूत कादंबरीचे आशयसूत्र फक्त प्रादेशिक मर्यादेत बसत नाही, तर मनुष्य स्वभावासंबंधी अनेक प्रश्न सामाजिक, धार्मिक अंगाबरोबर वाचकासमोर मांडते. आपला देश, समाज, वातावरण अन् संस्कृती यांच्याशी एकरुप झालेल्या धार्मिक जीवनपद्धतीचे विविध बारकावे पहावयास मिळतात. सामान्य माणूस धार्मिक संकल्पनेत कसा अडकून पडलेला आहे ते मानवी समाज जीवनाचा अतिशय संवेदनशीलतेने आढावा घेणारे विश्वास पाटील प्रस्तूत कादंबरीतून प्रत्यकारीतेने टिपतात. ग्रामीण समाजजीवनाला विश्वास पाटलांनी आपल्या कादंबरीचा विषय बनवून ग्रामीण भागातील विविध प्रश्नांना वास्तव स्वरुपात सामोरे आणले आहे. ग्रामीण समाजाचे विविधांगी दर्शन घडविण्यात विश्वास पाटील कसे यशस्वी ठरले आहेत ते सांगताना र.बा.मंचरकर म्हणतात, " 'पांगिरा' आणि 'झाडाझडती' या दोन्ही कादंबऱ्या भूमीचा एक विस्तृत पट आपल्या कवेत घेतात आणि काळाचा विस्तीर्ण पट उलगडत जातात. सरपंचापासून मुख्यमंत्र्यापर्यंतचे नाना वाणागुणाचे पुढारी, तलाठयापासून सचिवालयापर्यंतची प्रशासन यंत्रणा, कॉन्ट्रॅक्टर, हॉटेल मालक, बिल्डर्स यासारखे वेगवेगळया व्यवसायातील धनदांडगे छोटया वाडया-वस्त्या आणि तेथे आपापल्या सुख-दुःखनिशी जगणारी पाचोळयासारखी सामान्य माणसे असे विविधरंगी विश्व त्यातून उभे राहते. ग्रामीण जीवनात उद्‌भवणारे अनेक प्रश्न त्यांनी नेमकेपणाने हेरलेले आहेत. धरणग्रस्तांचे, विस्थापिताचे प्रश्न मांडणारी 'झाडाझडती' ही लक्षणीय कादंबरी होय." र.बा.मंचरकरांनी 'झाडाझडती' कादंबरी मानवी समाजातील विविधांगी दर्शन कशी घडविते हे सांगितले आहे. मानवी समाज आपल्या जीवनात उद्‌भवणाऱ्या प्रश्नांना धार्मिक भावनेशी जोडून आपले जीवन जगत असतो. त्यांच्या जगण्यात धार्मिक मुल्यांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले असते.

नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही कादंबरी गावगाडयातील सामाजिक जीवनाला साकार करण्याबरोबरच धार्मिक भाव-भावनेला ग्रामीण समाजात किती मोठे महत्व असते, ते अत्यंत संवेदनशीलतेतून मांडतात. ग्रामीण समाजव्यवस्था ही अठरापगड जातींनी बनलेली असते. प्रत्येक जाती-धर्मानुसार घरांची रचना झालेली असते. प्रत्येक जातीची घरे गावच्या कोणत्या दिशेला, कोणत्या ठिकाणी असावीत याचा दंडक पूर्वीपासनूच ठरलेला आहे. ग्रामीण जीवनातील या रुढी-परंपरा आणि रिती-रिवाज गावगाडयातील मांग जमातीला जगणे कसे असाह्य करुन सोडतात ते नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' मधून पहावयास मिळते. गावाच्या रचनेविषयीचे संकेत मानवी करतात याविषयी शंकरराव खरात यांचे मत विचारात घेणे महत्वाचे वाटते त्यांचे मत असे, "गाव तटाच्या बाहेर गावात महार, मातंग, लोहार यांची वस्ती घर कायमस्वरुपी दिसतात. तो गाव वसल्यापासून ते शतकानुशतकं तिथंच कायम ठाण मांडून आहेत. गावकुसाच्या बाहेरील ही महार, मांग अन् लोहार यांची वस्ती म्हणजे कायमची , पक्क्या स्वरुपात असलेली अस्पृश्यतेची स्मारकं आहेत. ही पूर्वी अस्पृश्य मानलेल्या समाजाची वस्ती गावच्या पूर्वभागत थोडसं दक्षिणेकडे झुकती अशी वसलेली आहे." स्पृश्य-अस्पृश्य असा भेद करणारी ही भारतीय खेडयाची रचना धार्मिक समजुतीतून बनली असल्याने स्वातंत्र्योत्तर काळतही ती समाजात आपले अस्तित्व अशी टिकवून धरलेली आहे ते शंकरराव खरात यांनी अतिशय नेमकेपणाने सांगितलेले आहे.

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे यांची दीर्घ कादंबरी विशाल मानवी जीवन समूहाला अतिशय विविधांगी स्वरुपात साकार करते. राजकीय जीवन चित्रपटाला प्रभावीपणे साकारणारी ही कादंबरी मानवी जीवनाला सखोलतेने स्पर्श करते. ही कादंबरी राजकीय, सामाजिक जातीय समीकरणाचा सहकार, शिक्षणक्षेत्र व धार्मिक जीवनातील मूल्य ऱ्हासांचा शोध घेणारी ही कादंबरी समकालीनात विशेष उल्लेखनीय आहे. 'ताम्रपट' ही कादंबरी प्रामुख्याने राजकीय जीवनाला अभिव्यक्त करत असली तरी मानवी समाज आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या सामाजिक आणि धार्मिक जीवनालाही अधोरेखित करते. लेखक आपल्या सभोवताल जीवनाचे चित्रण आपल्या प्रतिभेशक्तीद्वारे साहित्यकृतीतून साकरित असतो. लेखकाच्या समजिक, धार्मिक, सांस्कृतिक, मुल्यसंस्कारातून त्याची साहित्यकृती जन्माला येत असते. समाजातील विशिष्ट घटना आणि प्रसंगांना आपल्या कल्पनाशक्तीद्वारे विविध व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून लेखक साकारित असतात. लेखकाच्या निर्मितीत या घटकांचा अंतर्भाव कसा होतो याविषयी डॉ.श्रुती वडगबाळकर यांनी मांडलेले मत विचारात घेऊन लेखकाच्या निर्मितीत सामाजिक घटकांचा होणारा

शिरकाव कसा असतो ते पाहता येते त्या म्हणतात, "लेखक हा निर्मितीक्षम कलावंत असला तरी तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो. त्यांच्या कृती उक्तीला नेहमीच एक सामाजिक परिणाम असतो. प्रत्येक समाजाची धारणा, त्यामागील रचनातत्वे वेगळी असतात. धर्मकल्पना, रुढी, तत्वप्रणाली, आचार-विचार, दृष्टीकोन, संकेत, शिष्टाचार, नितिकल्पना इ. विशेष स्वतंत्र वा वेगळे असतात. त्या सर्वांद्वाराच त्या त्या समाजाची जीवनपद्धती निश्चित होत असते. लेखक अशाच एखाद्या समाजाचा घटक असतो. त्या व्यक्तिमत्वाच्या घडणीत, त्याचा काही खास पिंडधर्माबरोबर त्याच्या समाजाच्या पारंपारिक संस्कारांचा, मुल्यव्यवस्थेचा, जीवनपद्धतीचा वाटा असतो." लेखकांची निर्मिती ही सामाजिक जीवन प्रवाहातील विविध घटकांपासून कशी होते सांगतानाच लेखक या समाजाचाच एक घटक असल्याने त्याच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण या मुल्यव्यवस्थेतून कशी होते ते डॉ.वडगबाळकर यांनी अतिशय नेमकेपणाने सांगितले आहे.

'तणकट' ही राजन गवस यांची कादंबरी आपल्या सांस्कृतिक जीवनातील महत्वपूर्ण प्रश्नावर प्रकाश टाकते. गाव आणि गावकुसाबाहेरील जीवनावर प्रत्ययकारीतेने भाष्य करणारी प्रस्तुत कादंबरी या जीवनाकडे येथे नव्या, पुरोगामी अन् विधायक अशा दृष्टीकोनातून पाहिले. आत्मपरिक्षण आणि चिंतनाच्या वाटेने वास्तववादाचे दर्शन तर घडतेच परंतू या दृष्टीकोणामुळे हे जीवनदर्शन अधिक व्यापक आणि सखोल होते. राजन गवस यांनी ग्रामीण समाजजीवनाला अधोरेखित करताना ग्रामीण समाजात धार्मिक नितीकल्पना आजही कशा रुतून बसल्या आहेत ते सांगून गावातील किंवा गावकुसाबाहेरील लोक रुढी, रिती, रिवाज, परंपरा यांना अंगिकारुन जीवन जगत असल्यानेच धार्मिक नितीकल्पनेची साखळदंडे दिवसेंदिवस घट्ट होत चालल्याची जाणीव होते. तसेच ग्रामीण समाजाचे हे मागासलेपण स्वार्थी, मतलबी आणि सत्तापिपासू वृत्तीच्या पुढाऱ्यांमुळे कशी वाढत गेले आहे यावरही भाष्य केले आहे.

## सारांश :

अशाप्रकारे सरतेशेवटी सारांशरुपाने सांगत येते की, 'धर्म' ही संकल्पना संपूर्ण मानवी समाजाला व्यापून टाकणारी आहे. 'धर्म' या संकल्पनेभोवती मानवाचे समग्र जीवन केंद्रीत झालेले आहे. मानवी समाजात 'धर्म' आणि 'धार्मिक भाव-भावना' अत्यंत महत्वाच्या आहेत. लेखक मानवी समाजाचा एक घटक असल्याने आपला समाज आणि सभोवताल आपल्या प्रतिभासंपन्नतेतून साकारताना या समाजातील वेगवेगळया घटनांना लेखक अभिव्यक्त करीत असतात. मानवी समाजातील धार्मिकतेचे विविधांगी दर्शन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून विविधांगी स्वरुपात अतिशय नेमकेपणाने झालेले आहे. या धार्मिक जीवनाला साकारणाऱ्या प्रस्तुत कलाकृती आपल्या रचनांगाच्या वैविध्यसंपन्नतेमुळे वेगळया आणि दर्जेदार ठरल्या आहेत.

मानवी समाजातील धार्मिक नितीकल्पना कालखंडानुरुप कशा बदलत गेल्या आहेत. ते या कलाकृतीतून प्रत्ययास येते. मानवी समाजातील धार्मिक रुढी-परंपरा समाजाला कशा पोषक आणि घितक आहेत याचा प्रत्यय येतो. या साहित्यकृतीतून साकारणारे धार्मिक जीवनाचे चित्रण कसे वैविध्यसंपन्न आणि वास्तव जीवनचित्रण रेखाटनारे आहे ते अनुभवास मिळते आणि असे उच्चपातळीवरचे जीवनचित्रण या कलाकृतीला दर्जेदार ठरविण्यास साह्यभूत ठरते आणि म्हणूनच कलाकृती साहित्य अकादमीच्या पुरस्कारास पात्र ठरते.

## निष्कर्ष

पुरस्कार प्राप्त कथात्मक साहित्यातील धार्मिक चित्रणाचा विविधांगी विचार स्पष्ट केला आहे. मानवी समाजात 'धर्म' या कल्पनेला अत्यंतिक महत्व आहे. माणसाच्या जगण्याची चौकट या संकल्पनेभावेती स्थिरावलेली आहे. धार्मिक आचरणाची जोपासना करणारा मानवी समाज सर्वत्र आढळतो. लेखक या समाज जीवनाचाच एक अविभाज्य घटक असल्याने या धार्मिक मुल्यात्मकतेचे संस्कार त्याच्यावर होणे क्रम प्राप्त ठरते. त्याचबरोबर या धार्मिक मुल्यात्मकतेचे पडसाद त्याच्या अभिव्यक्तीद्वारे चित्रित होणे संयुक्तिक वाटते.

- पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून साकारलेले धार्मिक जीवनाचे चित्रण मानवी समाजावर धार्मिक जीवनाचा प्रभाव किती व्यापक स्वरुपाचा आहे ते सिध्द करते. तसेच धर्म या संकल्पनेभोवती मानवी समाजात पौराणिक काळापासून आजतागायत कसा स्थिरावलेला आहे ते स्पष्ट होते.
- वेगवेगळया मानवी समाजाचे जीवन चित्रण करणाऱ्या या कलाकृती त्या त्या समाजाच्या धार्मिक स्थितीचा धार्मिक व्यवस्थेचा, धार्मिक मुल्यांच्या आणि धर्माला विश्वासाचा आधार देऊन मानवाला धार्मिकतेच्या बंधनात कसे बंदिस्त केले जाते या वास्तविक परिस्थितीचा आढावा कशा घेतात ते स्पष्ट होते.
- या पुरस्कार प्राप्त वेगवेगळया कलाकृतींची निर्मिती करणारे लेखक विविध जाती धर्मात जन्माला आलेले असल्याने आपला समाज आपली जात आपला धर्म या विचारसूत्राला लेखकांनी प्राधान्याने कसे अविष्कृत केले आहे ते स्पष्ट होते.
- पुरस्कारप्राप्त या कलाकृती वेगवेगळया समाज समुहाचे प्रतिनिधित्व करतानाच या मानवी समूहात धर्माला असणारे स्थान, धर्माबद्दल रुढ झालेल्या श्रध्दा, अंधश्रध्दा सर्व सामान्यांची धार्मिक मनोवृत्ती, धार्मिक पाखंडता यांचे वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण चित्रण या कलाकृतीतून प्रत्ययास येते.

- या साहित्यकृतीतून साकारणारे धार्मिक जीवन विचारात घेताना धर्माविषयी असणारे आधुनिक विचार धार्मिक संघर्ष या धार्मिक पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांची असणारी मानसिकता याचा विचार करुन शेवटी साहित्यकृतीवर होणारा धर्माचा प्रभाव विचारात घेऊन धर्माचे राजकारण हाच अधर्म आहे हे सिध्द होते.
- एकूण माणसाच्या धार्मिक विचारांना अत्यंत्यिक प्रभावीपणे रेखाटणाऱ्या या कलाकृती तत्कालीन धार्मिक जीवनाचे दर्शन घडवितात. त्याचबरोबर कलाकृतीच्या गुणात्मकतेत महत्वपूर्ण भूमिका बजावते आणि म्हणून वेगळेपण सिध्द करुन अकादमीच्या पुरस्कारास पात्र ठरतात हे स्पष्ट होते.

## संदर्भ सूची

१. लक्ष्मणशास्त्री जोशी, आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, दत्ता भगत, चिन्मय प्रकाशन, औरंगाबद प्र.आ.२००८ पृ.क्र.२८.
२. डॉ.सुमन बेहरे, अमृत (मासिक) धर्माची सामाजिक कार्य, संपा.मनोहर शहाणे, अरविंद पोतनीस, गावकरी प्रकाशन, नाशिक वर्ष ५७, अंक - ५ जून २००९ पृ.क्र.११.
३. गोविंद पानसरे, धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा, लोकवाङ्मयगृह, मुंबई दु.आ.जाने २००८, पृ.क्र.१९.
४. चंद्रकांत बांदिवडेकर, देशीवाण, अक्षर प्रकाशन, मुंबई प्र.आ.मार्च २००२, पृ.क्र.६८, ६९.
५. वि.स.खांडेकर, ययाति, मेहता पब्लिशिग हाऊस पुणे, एकतीसावी आवृत्ती २०११, पृ.क्र.५५.
६. वि.स.खांडेकर, तत्रैव पृ.क्र.३९४.
७. वि.स.खांडेकर, तत्रैव पृ.क्र.४११.
८. श्री.ना.पेंडसे, रथचक्र, मौज प्रकाशनगृह, मुंबई, पृ.क्र.४०.
९. चंद्रकांत बांदीवडेकर, उ.नि. पृ.क्र.१०२.
रणजीत देसाई, स्वामी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे सव्विसावी आवृत्ती, मार्च २००७, पृ.क्र.२८.